उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/ तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाचे दर सुधारित करण्याबाबत..

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : अर्थसं-२०२२/प्र.क्र.१०५/(१)/मशि-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मार्च, २०२३.

वाचा: १) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- टीईडी-२००८/(१८३)/०८/तांशि-५, दिनांक ०५ नोव्हेंबर,२००८.
२) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- संकीर्ण-२०१८/(१८५/१८)/मशि-३, दिनांक १४ नोव्हेंबर, २०१८.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- संकीर्ण-२०२१/(७५/२१)/(१)/मशि-३, दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१.
४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्रमांक- संकीर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि-१, दिनांक १७ ऑक्टोबर, २०२२.

**प्रस्तावना**:

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी सैध्दांतिक, प्रात्याक्षिके इत्यादी कामांकरीता संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांचे मानधनाचे दर निश्चित करण्यात आले आहेत. संदर्भाधीन शासन निर्णयांन्वये लागू करण्यात आलेले मानधनाचे दर सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत सर्वांगीन विचार करुन खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय**:

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारितील उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय महाविद्यालये/संस्था तसेच अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमध्ये विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी नियुक्त करण्यात येणाऱ्या अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना प्रदान करावयाच्या मानधनाच्या दरात या शासन निर्णयान्वये पुढीलप्रमाणे वाढ करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचा प्रकार | दि.२२/१०/२०२१ नुसार प्रति तास दर | | सुधारित दर (प्रति तासाकरीता) | |
|---|---|---|---|---|---|
| | | सैद्धांतिक | प्रात्याक्षिके | सैद्धांतिक | प्रात्याक्षिके |
| १ | कला, वाणिज्य, विज्ञान (पदवी) | रु.६२५/- | रु.२५०/- | रु.९००/- | रु.३५०/- |
| २ | कला, वाणिज्य, विज्ञान (पदव्युत्तर) | रु.७५०/- | रु.३००/- | रु.१०००/- | रु.४५०/- |
| ३ | शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु.७५०/- | रु.३००/- | रु.१०००/- | रु.४५०/- |
| ४ | विधी (पदवी/ पदव्युत्तर व्यावसायिक अभ्यासक्रम) | रु.७५०/- | रु.३००/- | रु.१०००/- | रु.४५०/- |

२. सदरहू सुधारित दर दिनांक ०१ एप्रिल, २०२३ पासून अनुज्ञेय होतील.

३. वरील सुधारीत दर पुढील अटींच्या अधीन राहून मंजूर करण्यात येत आहेत.

१) शासकीय महाविद्यालये/संस्था यामधील अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांसाठी संदर्भाधिन क्र.१) येथील शासन निर्णय, दिनांक ०५/११/२००८ मधील नमूद अटी कायम राहतील.

२) उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी अभ्यांगत/तासिका तत्वावरील अध्यापकांना संदर्भाधिन क्र.२) येथील शासन निर्णय, दिनांक १४/११/२०१८ मधील परि.क्र.२ मध्ये नमूद अटी कायम राहतील. तसेच संदर्भिय क्र.४) येथील शासन निर्णयात नमूद विहित कार्यपध्दतीचे काटेकोरपणे पालन करावे.

४. याव्यतिरिक्त सध्याचा तासिका कालावधी ४८/५० मिनिटांऐवजी ६० मिनिटे करण्यास मान्यता देण्यात येत आहे, जेणेकरुन ९ तासिकांची परिगणना करणे सोईचे होईल. तसेच National Credit Framework च्या अनुषंगाने Credit साठी आवश्यक अध्यापनाचे वेळापत्रक (Lacturers Schedule) करणे सोईचे होईल. मात्र National Credit Framework ची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु होईपर्यंत विद्यापीठांना सध्याचा तासिका कालावधी चालू ठेवण्याची मुभा राहील.

५. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्र.२७९/२०२३/व्यय-५, दिनांक १३/०३/२०२३ नुसार प्राप्त झालेल्या सहमतीस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०२३०३२७१९३९३५४९०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2023.03.27 19:44:18 +05'30'

**( प्रताप पां. लुबाळ )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
५. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक,उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य,पुणे.
७. महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
८. महालेखापाल ( लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
११. अधिदान लेखा अधिकारी, मुंबई.
१२. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये, महाराष्ट्र राज्य.
१३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
१४. प्राचार्य/संचालक, शासकीय महाविद्यालये/संस्था (सर्व)
१५. सर्व कार्यासने (मशि), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१६. कार्यासन साशि-१, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१७. निवड नस्ती, मशि-३, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.